# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/3012 /2025-26** **दि.20 / 03 /2026**

विषय :- माझी वसुंधरा महोत्सव 2026 कार्यक्रमाकरीता उपस्थित राहणेबाबत

**परिपत्रक**

मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा महोत्सव 2026 अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम दि.20 मार्च 2026 ते दि.22 मार्च 2026 या कालावधीत पार पडणार आहेत.

तरी दि.20 मार्च 2026 रोजी सायंकाळी 6.00 वाजता शालेय मुलांच्या पर्यावरणपुरक प्रकल्पाचे उद्घाटन समारंभाकरीता व दि.22 मार्च 2026 रोजी बक्षीस वितरण समारंभ व सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सायंकाळी 6.00 वाजता आरक्षण क्र.246, पद्मभुषण मेजर ध्यानचंद मैदान, सेव्हन इलेव्हन शाळेजवळ, मिरारोड पुर्व येथे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहावे.

रौप्य महोत्सवी वर्धापन दिना निमित्त दि.28/02/2026 रोजी गैरहजर कर्मचाऱ्यांचे 01 दिवसाचे वेतन कपात करण्यात आलेले आहे. तरी अधिकारी/कर्मचारी गैरहजर राहण्याची पुनरावृत्ती होणार नाही, याची सर्व विभागप्रमुख यांनी दक्षता घ्यावी व आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याची सुचना आपल्या स्तरावर देण्यात यावी.

(डॉ.संभाजी पानपट्टे)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
1. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख
2. सर्व अधिकारी/कर्मचारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

"माझे शहर, माझा अभिमान"